असा. क्र. ६०

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, नोव्हेंबर २९, २००५/अग्रहायण ८, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २००५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १०.**—मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश . . . . . . | पृष्ठे ५१०-५१३ |

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ नोव्हेंबर २००५.

**MAHARASHTRA ORDINANCE No. X OF 2005.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE BOMBAY ENTERTAINMENTS DUTY ACT, 1923.

**सन २००५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १०.**

**मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ चा मुंबई १. १९२३, यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;



**[किंमत : रुपये ९.००]**

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) अध्यादेश, २००५ असे म्हणावे.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा केलेला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (ग-३) मध्ये, " जाहिरातीच्या बदल्यात पुरस्कर्त्याकडून देण्यात आलेली रक्कम " या मजकुरानंतर " अथवा पुरविलेल्या मालाचे किंवा दिलेल्या सेवांचे किंवा उपलब्ध करून दिलेल्या लाभांचे मूल्य " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. १९२३ चा मुंबई १.

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,—

(क) पोट-कलम (१३) मधील, खंड (ब) मधील, उपखंड (एक) ऐवजी, पुढील उप खंड दाखल करण्यात येईल आणि तो दिनांक २ जानेवारी २००२ पासून दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल :—

" (एक) वरील खंड (अ) मध्ये नमूद केलेल्या सवलतीच्या कालावधीत, बहुविध चित्रपटगृह संकुलातील किमान प्रवेश दर जिल्हाधिकारी निर्धारित करील. असा किमान प्रवेश दर हा, ज्या जिल्ह्यात बहुविध चित्रपटगृह संकुल असेल त्या जिल्ह्यातील कोणत्याही चित्रपटगृहाच्या सर्वाधिक दरांच्या पन्नास आसनांचा दर वगळून, प्रचलित सर्वाधिक दरापेक्षा कमी असणार नाही आणि त्यानुसार हे किमान प्रवेश दर सकाळच्या, मॅटिनीच्या आणि इतर वेळेच्या खेळांसाठी निरनिराळे असू शकतील. " ;

(ख) पोट-कलम (१५) मधील, तक्त्याऐवजी पुढील तक्ता दाखल करण्यात येईल :---

" **तक्ता**

| अनुक्रमांक | क्षेत्र | प्रति महिना, प्रति दूरचित्रवाणी संचावरील करमणूक शुल्काची रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | महानगरपालिकांच्या व कटकक्षेत्राच्या हद्दीतील | ३० |
| २ | " अ " व " ब " वर्ग नगरपरिषदांच्या हद्दीतील | २० |
| ३ | वरील नोंदी १ आणि २ च्या कक्षेत नसलेली कोणतीही इतर क्षेत्रे. | १० ". |

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम १०अ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०अ मधील, पोट-कलम (१) मध्ये, " जिल्हाधिकाऱ्याने कलम ४-ब अन्वये " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " दाखल करू शकेल : " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी " कलम ३ च्या, पोट-कलम (१३) अन्वये बहुविध चित्रपटगृह संकुलाचा किमान प्रवेश दर निर्धारित करणाऱ्या किंवा कलम ४-ब अन्वये शास्तीसह किंवा शास्ती न करता आकारणी करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशामुळे बाधा पोचलेला मालक, आदेश मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत आयुक्ताकडे अपील दाखल करू शकेल : " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## निवेदन.

मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ यामध्ये, तिकीट विक्री न करता, केवळ आमंत्रितांसाठीच आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी पुरस्कर्त्याची रक्कम म्हणून दिलेल्या कोणत्याही प्रदानावर शुल्क बसविण्याची तरतूद करण्यात आली आहे. रंगमंचीय कार्यक्रमांसारखे करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करताना, आयोजक, पुरस्काराच्या रकमेद्वारे केलेल्या प्रदानाखेरीज, हॉटेलमधील वास्तव्य, विमानप्रवास, परिवहन व जाहिरात यांसारख्या अन्य सेवा पुरवून देऊ केलेले प्रायोजकत्व स्वीकारतात असे आढळून आले आहे. या अन्य सेवांच्या बदल्यात, आयोजक, संबंधित पुरस्कर्त्यांना मानार्थ तिकिटे देतात. अशाप्रकारे आयोजकांना जरी केवळ पैशाच्या रूपातच नव्हे तर, मालाच्या किंवा सेवेच्याद्वारेदेखील लाभ मिळत असले तरीही, अशा सेवांवर कोणतेही करमणूक शुल्क प्रदान केले जात नाही. म्हणून असा माल, सेवा किंवा लाभ पुरविण्याबाबतचा खर्च " पुरस्कर्त्याची रक्कम " या संज्ञेच्या व्याख्येच्या कक्षेत समाविष्ट करण्यासाठी, उक्त व्याख्येत योग्य ती सुधारणा करणे, इष्ट वाटते.

२. शासनाने " बहुविध चित्रपटगृह संकुल " या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संपूर्ण कौटुंबिक करमणूक केंद्राची संकल्पना मांडून तिचा प्रसार केला आहे. या संकुलामध्ये एकाच छताखाली संपूर्ण कुटुंबासाठी करमणुकीच्या विविध सुविधा पुरविण्यात येतात. या संकुलांना, विवक्षित शर्तींच्या अधीनतेने, पाच वर्षांच्या कालावधीसाठी करमणूक शुल्क भरण्यातून सूट देण्यात आली आहे. या सूट मिळालेल्या कालावधीत, बहुविध चित्रपटगृह संकुलाच्या मालकाने आकारावयाची प्रवेश फी, त्याच जिल्ह्यातील एकपडदा चित्रपटगृहांच्या प्रचलित सर्वाधिक प्रवेश दरापेक्षा कमी असता कामा नये, ही त्यांपैकी एक अट आहे. एकपडदा चित्रपटगृहांना, बहुविध चित्रपटगृह संकुलापासून संभाव्य असणाऱ्या अनुचित स्पर्धेपासून संरक्षण मिळावे या हेतूने, उक्त अट लादण्यात आली आहे. तथापि, एकपडदा चित्रपटगृह मालकांनी हे सर्वाधिक दर काही आसनांसाठी अगदी अवाच्या सव्वा असे निश्चित केले असल्याचे निदर्शनास आले आहे, परिणामी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, या बहुविध चित्रपटगृह संकुलांना हे सर्वाधिक दर आपले किमान प्रवेश दर म्हणून ठेवणे भाग पडत आहे. बहुविध चित्रपटगृह संघटनेकडून अशी उदाहरणे नमूद केलेले अभिवेदन राज्य शासनास प्राप्त झाले आहे. समानतेच्या आणि तर्कसुसंगततेच्यादृष्टीने, बहुविध चित्रपटगृहांचा किमान प्रवेश दर ठरविण्यासाठी, त्या जिल्ह्याच्या एकपडदा चित्रपटगृहाचा, सर्वाधिक किमतीच्या पन्नास तिकिटांचा प्रवेशदर विचारात घेण्यात येऊ नये, अशी तरतूद करण्याचे प्रस्तावित केले आहे. सकाळच्या, मॅटिनीच्या आणि नियमित खेळांसाठी वेगवेगळे प्रवेशदर आकारण्याची व्यावसायिक प्रथा विचारात घेऊन, बहुविध चित्रपटगृह संकुलांनादेखील उक्त सुविधा पुरविण्याचे प्रस्तावित केले आहे. बहुविध चित्रपटगृह संकुलांना, २ जानेवारी २००२ पासून करमणूक शुल्कातून सूट मिळण्यास सुरुवात झाली असल्यामुळे, उक्त तरतुदींमध्ये २ जानेवारी २००२ पासून भूतलक्षी प्रभावाने सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

३. बहुविध चित्रपटगृह संकुलाचे प्रवेश दर निश्चित करण्याचा अधिकार, जिल्हाधिकाऱ्याला प्रदान करण्यात येत आहे. या अधिनियमाच्या कलम १०अ मध्ये, जिल्हाधिकाऱ्याने, शास्तीसह किंवा शास्ती न करता, संमत केलेल्या आकारणी आदेशाविरुद्ध अपील करण्याची आणि पुनरीक्षण करण्याची तरतूद आहे. उक्त कलम १०अ मध्ये योग्य ती सुधारणा करून, बहुविध चित्रपटगृह संकुलासाठी प्रवेशदर निश्चित करणाऱ्या, जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध अपील करण्याची आणि पुनरीक्षण करण्याची तरतूद करण्याचे प्रस्तावित केले आहे.

४. थेट घरपोच प्रसारण सेवेवर (डीटीएच) मे, २००२ पासून करमणूक शुल्क आकारण्यात येत आहे. या सेवेवरील करमणूक शुल्काचे दर केबल सेवेपेक्षा अधिक आहेत. भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने (TRAI), केबल आणि डीटीएच सेवांना एकसमान मानून या सेवांवर एकाच दराने करमणूक शुल्क आकारण्याची शिफारस राज्य शासनांना केली आहे. त्यानुसार, राज्य शासनाने, थेट घरपोच प्रसारण सेवेवरील करमणूक शुल्काचा दर, केबल सेवेवरील करमणूक शुल्काएवढा करण्याचे ठरविले आहे.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ यांत आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २६ नोव्हेंबर २००५.

**एस. एम. कृष्णा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विजयकुमार अग्रवाल,**
शासनाचे प्रधान सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई